## L. A. BILL No. XXVIII OF 2022.

A BILL

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.

## सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८.

**मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

**(विधानपरिषदेने दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१८८८ चा ३. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्त्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून, त्यांनी दिनांक २४ नोव्हेंबर २०२२ रोजी मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२२, हा प्रख्यापित केला होता ;

२०२२ चा महा. अध्या. १२.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्र्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२२, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २४ नोव्हेंबर २०२२ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १५४ ची सुधारणा.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) कलम १५४ मध्ये, पोट-कलम (१ड) मधील, खंड (अ) मध्ये,— १८८८ चा ३.

(एक) उप-खंड (एक) मधील, " व २०२१-२०२२ या वर्षी " या मजकुराऐवजी, ", २०२१-२०२२ या वर्षी व २०२२-२०२३ या वर्षी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) उप-खंड (दोन) मधील, " व २०२१-२०२२ या वर्षी " या मजकुराऐवजी, ", २०२१-२०२२ या वर्षी व २०२२-२०२३ या वर्षी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) उप-खंड (तीन) मधील,—

(अ) " २०२२-२०२३ या वर्षी " या मजकुराऐवजी, " २०२३-२०२४ या वर्षी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) " व २०२१-२०२२ या वर्षी " या मजकुराऐवजी, ", २०२१-२०२२ या वर्षी व २०२२-२०२३ या वर्षी " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**३.** (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या, मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरुप, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे, परंतु या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे निदेश, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे देता येतील :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्यात येईल.

२०२२ चा महा. अध्या. १२.

**४.** (१) मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२२, हा याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

सन २०२२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८.]**

**[मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**
मुख्यमंत्री.**]**

**(विधानसभेने दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

**(विधानपरिषदेने दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.